देशोन्नती

# शेळीपालन एक फायदेशीर व्यवसाय

**शेळी ही गरिबांची गाय आहे, असे सर्वसाधारणपणे समजले जाते. यामागचीधारणा लक्षात घेऊन शेळीपालनाचा सर्वांगीण अभ्यास केला असता असे दिसले की, शेळी हा दुध व मांस देणारा आदर्श प्राणी ठरला आहे. याचे कारण त्याला लागणारे कमी भांडवल व त्यातून मिळणारे किफायतशीर उत्पादन होय.**

**शेळीपालनाचे फायदे :-**

१) शेळी हा अत्यंत गरीब प्राणी व व्यवस्थापनास सोपा असून कुटुंबातील कोणतीही व्यक्ती त्याचे पालनपोषण करू शकते.

२) शेळीला कमी जागा लागते, बोकडास १५ चौ.फूट, शेळीस १० चौ.फूट, करडास५ चौ.फूट जागा लागते.

३) शेळीपासून मिळणारे दुग्धोत्पादन हे कमी खर्चात मिळू शकते.

४) शेळीपालन व्यवसायाकरता लागणारे भांडवल हे दुग्धव्यवसायाच्या तुलनेत खूपच कमी लागते.

५) शेळीपासून मिळणाऱ्या मांसास मागणी जास्त असल्याने बाजारपेठ सहजासहजी उपलब्ध होते व त्याची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे.

६) शेळीच्या कातडीला उत्तम बाजारपेठ मिळते.

७) शेळयांमध्ये रोगप्रतिकारकशक्ती जास्त असून त्या कटक असतात.

८) शेळयांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण खूपच कमी असते.

९) शेळया एका विताला २-३ करडे देतात. त्यामुळे त्यांची संख्या झपाटयाने वाढते.

**शेळयांच्या उत्तम जाती:-** मांसासाठी उस्मानाबादी, आसाम डोंगरी, काळी बंगाली, तपकिरी बंगाली, मारवाडी (राजस्थानी),काश्मिरी, गंजम (ओरिसा) या शेळया आहेत.

लोकरीसाठी अंगोरा (अरुणाचल प्रदेश) पश्मिना (काश्मीर) या शेळया आहेत.

दुध देणाऱ्या शेळयांमध्ये सानेन ही जात प्रसिध्द आहे. ही शेळी एक वितात ३०० लिटर दुध देते.

दुध व मांसासाठी उस्मानाबादी, सुरती, बारबेरी, जमुनापारी, मलबारी, सिरोही, बिटल, अजमेरी या जाती आहेत.

**पैदाशीसाठी शेळीची निवड:-**

नविन कळपासाठी शेळी निवडताना त्या शक्यतो गाभण १ ते ३ वर्षे वयोगटातील असलेल्या बघून घ्याव्यात.

व्यवसाय सुरु करताना १० शेळया व एक बोकड अशा गटाने सुरुवात करावी.

शेळीच्या नाकपुड्या मोठ्या, डोळे पाणीदार, शरीर लांबट व मजबूत असावे. पायाची ठेवण सरळ व शरीराच्या आकार त्रिकोणी आकार असावा.

कास मोठी व दुध काढल्यानंतर एकदम लहान होणारी असावी.

केस व त्वचा तुकतुकीत असावी.

मांसासाठी शेळया ठेवायच्या असल्यास त्या एकच करडू देणाऱ्या बघून घ्याव्यात व दुधासाठी शेळी हवी असल्यास एकच करडू देणारी असावी.

**शेळयांचे फायदे :-**

शेळी ८ व १२ महिने वयात पहिल्यांदा माजावर येते. दुसर्यांनदा २१



दिवसांनी येते. माज ३-४ दिवस टिकतो.

**माजाची लक्षणे :-**

शेळी खाणे पिणे टाळते. विशिष्ट आवाज करते.

इतर शेळयांवर उडते किंवा उडू देते.

यौनी औष्ठ थोडेसे सुजतात व योनीतून पारदर्शक स्राव होतो.

शेळीचा गाभण काळ १५० दिवसांचा (५ महिने) असतो.

व्याल्यानंतर ३ आठवडयानंतर शेळी पुन्हा माजावर येते.

शेळीच्या प्रजनन क्षमतेचा कालावधी ८ वर्षाचा असतो.

जर करडे मांसासाठी तयार करावयाची झाल्यास त्यांचे ४ आठवडयांनी खच्चीकरण करावे.

**गाभण शेळीची व नवजात करडाची निगा :-**

शेळी विन्यास १ महिना असताना दुध काढणे बंद करावे व या काळात ४०० ते ७०० ग्रॅम सुग्रास खाऊ घालावे म्हणजे गर्भाची वाढ चांगली होऊन व्याल्यानंतर शेळी भरपूर दुध देते.

नवजात पिलास शेळी चाटून स्वच्छ करते. तिने न केल्यास पिलाचे अंग स्वच्छ खरखरीत फडक्याने स्वच्छ कोरडे करावे. नाका-तोंडातील चिकट स्राव काढावा.

करडांना रुचकर सुग्रास पहिल्या आठवडयापासूनच देणे आवश्यक आहे. करडांनापहिले ४-५ दिवस आईच्या संगतीत राहून 'चिक' पिऊ दयावा. जेणेकरून त्यांच्यात रोगप्रतिकारशक्ती निर्माण होईल.

पैदासीकरिता उपयोग करावयाच्या करडांना २-३ महिने पर्यंत दुध व सुग्रास यांचा मिश्र आहार दयावा. नंतर दुध बंद करून चारा व सुग्रास दयावा.

**प्रा.ज्योती मोटे (सहाय्यक प्राध्यापक)**
मो.न. ८०८०६६५६५६
**डॉ.कल्पेश दि.मोरे(सहाय्यकप्राध्यापक)**
के.के.वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक.
**डॉ.श्रीकांत मोहन खुपसे** सहाय्यक प्राध्यापक
एम जी एम नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय गांधेली, औरंगाबाद